# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222

## शिष्यवृत्ती कक्ष

---

## शैक्षणिक सत्र 2018-19 शिष्यवृत्तीसंदर्भात अत्यंत महत्वाची सूचना

### दि. 30.01.2019

विद्यापीठाने आवाहन केल्यानुसार सर्व अभ्यासकेंद्र / विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद देऊन mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावरून शैक्षणिक सत्र 2018-19 साठी शिष्यवृत्ती अर्ज Online पद्धतीने सादर केल्याबद्दल सर्व विद्यार्थी व अभ्यासकेंद्रावरील सहका-यांचे अभिनंदन व धन्यवाद.

या सत्रापासून आपण विद्यार्थी व अभ्यासकेंद्रांशी संपर्कात राहण्यासाठी प्रथमत:च विद्यापीठ संकेतस्थळ व Whats App माध्यमांचा शिष्यवृत्ती कक्षाकडून प्रभावीपणे वापर करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या दोन्ही माध्यमातून तसेच ब-याचदा प्रत्यक्ष संपर्क साधूनही अभ्यासकेंद्र व विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहे . मात्र या सूचनांचे काही अभ्यासकेंद्र व विद्यार्थ्यांनी पालन न केल्याने विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरूनही विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरण्याची शक्यता अधिक आहे.

यापूर्वी साधारण 650 विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज त्यांच्या त्रुटीमुळे विद्यार्थ्यांच्या लॉगीलना पाठविण्यात आले होते. मात्र त्याकडेही विद्यार्थी/अभ्यासकेंद्रांनी दुर्लक्ष केल्यामुळे अद्यापही हे अर्ज विद्यार्थ्यांकडून Re apply केले गेले नसल्याचे विदारक सत्य समोर येतेय. त्यामुळे या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. काही केंद्रांनी स्वत: पुढाकार घेऊन तसेच त्रुटींची पूर्तता करून काही विद्यार्थ्यांचे अर्ज पुन्हा सादर केले आहेत. अशा केंद्रांचे धन्यवाद

मात्र आता वेळ खूप कमी असल्यामुळे व बरेचसे अर्ज अपात्र ठरत असल्याने तसेच विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये अशी विद्यापीठाचीही भावना असल्यामुळे विद्यापीठ लॉगीनला प्राप्त झालेले उपरोक्त 650 अर्जाव्यतिरिक्तचे अर्ज समाज कल्याण कार्यालयाकडे अग्रेषित (Forward) करण्यात आलेले आहेत, मात्र या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती टॅबमधील सूचनांनुसार मूळ कागदपत्रं अपलोड न केल्यामुळे तसेच मेल न केल्यामुळे, हे विद्यार्थीदेखील अपात्र ठरून शिष्यवृत्तीपासून वंचित राहू शकतात. अजूनही विद्यार्थ्यांना शेवटची संधी देण्यात येत आहे. **कृपया ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या सर्वच विद्यार्थ्यांनी (ज्याचे अर्ज पात्र ठरले आहेत किंवा ज्यांचे अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगीनला परत पाठविण्यात आले आहेत अशा सर्व) ycmou.ac.in या संकेतस्थळावरील (Portal) Scholarship टॅबमधील दि. 18.01.2019 च्या सूचनेतील (शैक्षणिक सत्र 2018-19 मूळ कागदपत्रं अपलोड करण्याबाबत व इतर महत्वाच्या सूचना 18.01.2019) सर्वच Original Documents च्या मूळ प्रती स्कॅन scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर दि. 31.01.2019 रोजी दुपारी**

**12.00 वाजेपर्यंत पाठवाव्यात,** जेणेकरून क्लर्क व प्रिन्सिपल लॉगीनमधून अशा विद्यार्थ्यांचे Original Document अजूनही अपलोड करता येऊ शकतील व विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरू शकतील.

ज्या शिक्षणक्रमांना शिष्यवृत्ती देय नाही, मात्र विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले आहेत. अशा विद्यार्थ्यांनी कृपया तातडीने संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क Demand Draft द्वारे जमा करावयाचे आहे.

जे विद्यार्थी Fail /ATKT आहेत, अशा विद्यार्थ्यांना Online Scholarship Forms न भरण्याबाबत विद्यापीठ संकेतस्थळ व Whats App माध्यमातून यापूर्वीच कळविण्यात आलेले असताना देखील अशा विद्यार्थ्यांनी Online शिष्यवृत्ती अर्ज सादर केलेले आहेत. अशा विद्यार्थ्यांनीही तातडीने संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क Demand Draft द्वारे जमा करावयाचे आहे.

शिष्यवृत्ती अर्जांची अंतिम तपासणी ही समाज कल्याण कार्यालय किंवा इतर संबंधित कार्यालय करीत असल्याने विद्यापीठाने शिष्यवृत्ती अर्ज अग्रेषित (Forward) केले असले तरीही, समाज कल्याण किंवा संबंधित कार्यालयाने शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरविलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणार नाही, याची कृपया सर्व विद्यार्थी व अभ्यासकेंद्रांनी नोंद घ्यावी.

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी, ही विद्यापीठाची भावना असून आपणही या विद्यापीठाचेच सदस्य असल्याने सर्वच विदयार्थ्यांकडून व अभ्यासकेंद्राकडून या कार्यात सहकार्याची अपेक्षा आहे.

धन्यवाद !

**संचालक,**

**विद्यार्थी सेवा विभाग**